# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार**

**क्र.रामाआ/तक्रार/२२२/२०२४/अहिल्यानगर**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.भानुदास बाबुराव म्हसे, रा.मु.पो.सुभाषवाडी, ता.श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर. |

**सुनावणी दिनांक-१६/०७/२०२५**

तक्रारदार यांनी दि.१२/०४/२०२४ रोजीच्या अर्जान्वये, "दि.२६/१०/२०२३ व दि.०४/०१/२०२४ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तसेच दि.१२/०२/२०२४ च्या प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने दि.०४/०३/२०२४ रोजी ठेवण्यात आलेल्या सुनावणीची नोटीस दि.०८/०३/२०२४ रोजी प्राप्त झाल्याने मी सुनावणीस हजर राहू शकलो नाही. त्यामुळे याबाबतचे पुरावे तपासून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व माझी झालेली नुकसान भरपाई मिळावी." असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१६/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी- तक्रारदार उपस्थित असून तत्कालीन आणि विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२६/१०/२०२३ व दि.०४/०१/२०२४ रोजीच्या दोन मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

दि.२६/१०/२०२३ रोजीचा माहिती अर्ज:- “१)मानव हक्क संबंधित माहिती काय कारवाई केली त्या अहवालाच्या प्रति मिळावी कलम ६(१) प्रमाणे दि.०५/०९/२०२२ रोजी मी मानव हक्क विरोधात लेखी तक्रार केलेली आहे. पुरावे देवून कारवाई करण्याकरीता महसुल विभाग (कलम ४(१)प्रमाणे) म्हणून तरी माझा दि.०५/०९/२०२२ रोजीचा अर्ज कलम ७(१) प्रमाणे निकालात काढून आज पर्यंत कोणती कारवाई झालेली आहे त्या अहवालाच्या प्रति मिळाव्यात. २) दि.०५/११/२०२२ उपविभाग अधिकारी, शिर्डी कार्यालयाकडील शेरा पत्र क्र.कावि/जमीन-२/५१९, दि.०६/१०/२०२२ अन्वये आपला अर्ज तहसिलदार राहाता यांचे कार्यालयास हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. तरी या पत्राच्या प्रती मिळाव्यात.”

दि.०४/०१/२०२४ रोजीचा माहिती अर्ज:- “पी.एम.किसान योजना २०१९ साला पासुन चालू झालेली आहेत गट नंबर १६० ममदापुर, ता.राहाता, जि.अहमदनगर या गटामध्ये रामदास बाबुराव म्हसे हे पी.एम.किसान योजनेचा लाभ घेता की नाही व लाभ घेत असल्यास त्याच्या प्रती मिळाव्यात. व २०१९ ते २०२३ पर्यंत किती अनुदान दिले गेले याच्या प्रति मिळाव्यत.”

४. तक्रारदार यांनी माहिती न मिळाल्याने दि.१२/०२/२०२४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, राहाता यांचेकडे दि.२६/१०/२०२४ व दि.०४/०१/२०२४ जोडपत्र अ नियम

३ प्रमाणे मागितलेली माहिती मिळाली नाही असे नमूद करुन प्रथम अपिल दाखल केले असून त्यामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, राहाता यांनी दि.११/०३/२०२४ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास या आदेशापसून १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले आहेत.

५. सुनावणी दरम्यान उपस्थित तक्रारदार यांनी असे कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार देखील कोणतीही माहिती मिळाली नाही.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तत्काली जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय राहाता यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्याल राहाता, यांनी दि.१३/०३/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय राहाता यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच, सुनावणीवेळी तक्रारदार यांनी माहिती मिळाली नसल्याचे कथन केले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय राहाता यांनी माहिती दिली नसल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांनी पारित केलेल्या दि.१३/०३/२०२४ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, राहाता, ता.राहाता, जि.अहिल्यानगर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र.२२२/२०२४/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८७६

दिनांक:- 12 MAR 2026